भाग ३

# मूठभर गोष्टी



## औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

समग्र शिक्षा अभियान-शिक्षण विभाग

# संवाद...

महानगरपालिकेच्या शाळांमधील शिक्षकांच्या सर्जनशीलतेला आवाहन करून त्यांच्यातील प्रतिभा कथारूप पुस्तकाच्या निमित्ताने आपल्यासमोर ठेवतांना मला मनस्वी आनंद होत आहे.

कथा या विद्यार्थी व शिक्षकांचे भावविश्व उमलवू शकतात. कथा सांगताना शिक्षक व विद्यार्थी भेद विसरून एकाच भावनिक पातळीवर स्थिरावतात. आनंद, सुख, दु:ख, भीती, त्याग, बंधुभाव, निष्ठा, प्रेम इ. भावना ते एकाचवेळी समरसून अनुभवतात. वर्गाध्यापनाच्या दृष्टीने आपला परंपरेने चालत आलेला हा ठेवा अतिशय महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांचा शब्दसाठा वाढवणे, वाक्यरचना शिकवणे, भावना व्यक्त करणे, श्रवण, संभाषण या कला विकसित करणे यासाठी कथा हे माध्यम मध्यवर्ती भूमिका बजावते.

सर्व शाळा प्रगत करणे व गुणवत्ता विकास करणे हे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे. शिक्षकांमधल्या अंत:स्फूर्तीला, नवनिर्माणक्षमतेला नवे क्षितिज उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच ज्या शिक्षकांच्या क्षमतेवर गुणवत्तेचा रथ ओढावयाचा आहे ती विकसित करणेही गरजेचे आहे. ही बाब ओळखून म.न.पा. आयुक्त, मा. डॉ. निपुण विनायक तसेच श्रीमती डॉ. निधी विनायक यांच्या प्रेरणेमधून 'मूठभर गोष्टी' हा कथासंग्रहाचा उपक्रम साकार होत आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू भाषेतून कथा लिहिल्या आहेत. शिक्षकदिनी या पुस्तकाचे विमोचन करून सर्व कथालेखक शिक्षकांचा सत्कार करत आहोत. हा आमचा पहिलाच उपक्रम असल्यामुळे आपण निदर्शनास आणून दिलेल्या सूचनांचे भविष्यात स्वागत राहील.

या कामी सहकार्य करणारे साहित्यिक श्रीमती डॉ. लीला शिंदे, प्रा. डॉ. दासू वैद्य, श्री. उद्धव भयवाळ, डॉ. विशाल तायडे, श्री. अबु बकर रहेबर, श्री. संजय कुलकर्णी यांचे विशेष आभार.

**श्रीकांत कुलकर्णी,**
शिक्षणाधिकारी
म.न.पा., औरंगाबाद


**प्रेरणा व संकल्पना**

डॉ. निपुण विनायक, (भा.प्र.से.)
आयुक्त, म.न.पा. औरंगाबाद
डॉ. श्रीमती निधी विनायक

**मुद्रक :**

ड्रीम्स् प्रिंट ॲण्ड पॅक
एम.आय.डी.सी. चिकलठाणा,
औरंगाबाद. मो. 8888888011

**प्रकाशक :**

श्रीकांत कुलकर्णी
शिक्षणाधिकारी,
म.न.पा. औरंगाबाद

**मुखपृष्ठ संकल्पना**

श्री. ज्ञानेश्वर असोलकर
(कलाशिक्षक)
श्री. विनोद भोरे
(कलाशिक्षक)

**मुद्रितशोधन :**

डॉ. नागेश अंकुश

**विशेष साहाय्य :**

ज्ञानदेव सांगळे
स.का.अ.म.न.पा.
संजीव सोनार प्र.सां.अ.

**परीक्षक तथा मार्गदर्शक समिती**

श्रीमती डॉ. लीला शिंदे
प्रा. डॉ. दासू वैद्य
डॉ. विशाल तायडे
श्री. उद्धव भयवाळ
श्री. अबू बकर रहेबर
श्री. संजय कुलकर्णी

# मूठभर गोष्टी

## भाग ३

औरंगाबाद महानगरपालिका

शिक्षण विभाग

# अनुक्रमणिका


१. मामाला पत्र ........................................................................१

२. वैज्ञानिक दृष्टिकोन ..................................................................४

३. जिज्ञासू अनिकेत ......................................................................६

४. गट्टी माझी शाळेशी ...................................................................८

५. एका होतकरु मुलीची गोष्ट ......................................................१०

६. पेन्सिलीची पंचसूत्री ................................................................१३

७. आत्मबल ...............................................................................१५

८. निश्चय करा, यश तुमचेच ! ......................................................१८

९. बोलणारे झाड .........................................................................२३

१०. खरी कमाई ..........................................................................२५

११. जगण्याची उमेद ....................................................................२८

१२. प्रयत्न ..................................................................................३०

# मामाला पत्र

सरांसमोर वह्यांचा गठ्ठा होता. ते एक-एक वही तपासत होते. माझं लक्ष पुस्तकात कमी आणि सरांकडे अधिक होतं. माझी वही सरांनी तपासण्यासाठी घेतली व माझ्या पोटात भीतीचा गोळा उठला.

'विशाल इकडे ये'' सरांचा आवाज वर्गात घुमला.

''काय सर ?'' जवळ जाऊन हळूच विचारलं.

''काय लिहिलेस हे ? कुत्र्याचे पाय मांजरला आणि मांजराचे पाय कुत्र्याला लावलेस. तुझं तुला तरी वाचता येतं का ?'' सरांनी गुगली टाकली.

माझी मान खालीच..

''आता तूच वाच.'' सर उफाळले.

''नाथा महाराज पठणचे होते. गादावरी काठीवर बसायचे.'' मी वाचू लागलो. वर्गात हशा पिकला. सरांना हसावं की रागवावं तेच समजत नव्हतं. माझी भीतीनं त्रेधातिरपीट उडाली होती. वर्गातून धूम ठोकण्याच्या तयारीत उभा राहिलो.

शिक्षकांनी दारात उभा केलेला परश्या दिसला. माझ्यापेक्षा तो दोन-तीन वर्षांनी मोठा. मधल्या सुट्टीत दोन-चार मुलांना सहज बदडून काढायचा. शिक्षकांसमोर गुमान उभं राहिल्याशिवाय पर्यायच नव्हता. काय झालं कुणास ठाऊक ?

शिक्षकांच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले.

''बाळ, तू प्रश्नांची उत्तरं किती छान देतोस !''



शिक्षकांचा बोलण्यात गोडवा होता.

'' हो सर'' मी विरघळलो.

''तुझं अक्षर मोत्यासारखं असावं. तू खडखड वाचावं. सर्वांनी तुझं कौतुक करावं, असं नाही वाटत तुला ?.'' शिक्षकांनी विचारलं.

''हं'' मी उत्तरलो.

''सोपं आहे. त्यासाठी तुला दररोज थोडा वेळ द्यावा लागेल.

''जमेल मला ?''

'' का नाही ? प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे.''

टण्, टण्, टण्.. शाळेची घंटा वाजली. सर्व मुले वर्गातून बाहेर पडली. मी मात्र वर्गातच रेंगाळत होतो.

''बाळ, जा उद्या लवकर ये.'' सरांचा आवाज आला.

घरी गेलो. उभ्यानेच दप्तर कोपऱ्यात फेकलं.

आईने विचारले, ''पोस्टातून पत्र आणलं का ?''

''नाही विसरलोच.''

पळतच जाऊन पत्र आणलं. मिलिट्रीतल्या मामाला लिहायचं होतं ते. आल्यावर खूप लाड करणारा मामा. खाऊ, खेळणी, भरपूर आणायचा. आज ताईही घरी नव्हती. त्यामुळे आई मलाच पत्र लिहावयास सांगणार म्हणून मला फार आनंद झाला होता. मी मांडी घालून पत्र लिहायला बसलो. आई हसतच म्हणाली,

''पत्र विशाल लिहिणार ?'' पत्र मामालाच न्हाई तर बरमदेवाला सुदिक वाचता येणार न्हाई.''

इतक्यात तायडी आली. तिने पत्र लिहिले. आईने तिच्याकडून तीन वेळा वाचून घेतले. ते पत्र पेटीत टाकण्याचं काम मात्र मला मिळालं.

रात्री अंथरूणावर पडलो. बराच वेळ झोपेची प्रार्थना केली. झोप प्रसन्न होत नव्हती. उशिराने केव्हा झोप लागली समजलच नाही. सकाळीच उठलो. आवराआवर केली. कोनाड्यातील दोनरेघी वही झटकताना नाकात धूळ गेली. दोन-तीन शिंका आल्या. वही दप्तरात कोंबली. सरळ शाळेचा रस्ता धरला. खूणगाठ मनाशी बांधूनच शाळेची पायरी चढलो. शाळा भरण्यास आणखी बराच वेळ बाकी होता. शाळेत फक्त सरच आलेले होते. सरांजवळ गेलो. मनाचा निर्धार केला.

''सर मला, लिहायला, वाचायला शिकायचं ''

''व्वा....!''

''आजपासून, आतापासून...!''

सरांच्या हातात दोन रेघी वही, पेन्सिल दिली. सरांनी पहिल्या पानावर सुंदर अक्षरांत माझं नाव, वर्ग, विषय लिहून दिले. दुसऱ्या पानावर अ, आ, इ, ई.... मोत्यासारखं चमकू लागलं. मैदान मुलांनी आणि माझ मन दाणेदार अक्षरांनी भरलं होतं.

आठवडाभरातच अ ते ज्ञ चांगलंच.. ओळखीचं झालं. अक्षरंही बऱ्यापैकी वळणदार लिहू लागलो. सुरुवातीला हात वळायचाच नाही. सर हातात हात घेऊन अक्षरं गिरवून घ्यायचे. अक्षर ओळखायला सांगायचे. लिहून घ्यायचे. अक्षरं एका पंगतीत बसू लागली. दुसरी पंगत शब्दांची बसू लागली. काना, मात्रा, वेलांटी, उकार, वावरु लागले. पानापानातून वर्गात, मैदानात, घरात, अंगणात, अंथरुणात, पांघरुणात शब्दांची गट्टी जमली. वर्गातील अजय, विजय, अक्षय या हुशार त्रिकुटाशी गट्टी केली. कोणताही शब्द आडवा आला की, त्रिकुटाच्या मतीने आडवा केलाच समजला.

वाचायला सारखा ध्यास घेतला. रस्त्याने चाललो की, थांबून दुकानाच्या पाट्या, जाहिराती वाचायचो. बागेत फिरताना सूचना वाचायच्या. घरात बसलं की, वर्तमानपत्र वाचायचं. दुसरी,तिसरीची पुस्तकं वाचायची. अडलं घोडं तर सर,ताई नाहीतर त्रिकूट आपलं ठरलेलचं.

सूर्य पूर्वेचा पश्चिमेला उगवेल; पण शुद्धलेखन कधी टळले नाही. माझा नित्यक्रमच होता तो स्वत: लिहिललं वाचताना मन सद्गदीत व्हायचं. मोत्यासारख्या अक्षरांनी भरलेल्या पानांकडे बघून डोळे दिपून जायचे माझे आणि सरांचेही.

एक दिवस वर्गात हस्ताक्षर स्पर्धेची सूचना आली. आंतरशालेय हस्ताक्षर स्पर्धा होती ती. मी त्यात भाग घेतला. विशेष म्हणजे, त्यात मला बक्षीस मिळाले. ही आनंदाची बातमी घरी येऊन मी आईला सांगितली. आईला तर ही बातमी ऐकून खूपच आनंद झाला. आई म्हणाली,'' विशाल, आता मामाला पत्र तूच लिव्ह.'' हे ऐकताच मला आभाळाएवढा आनंद झाला.

**– डॉ. संपत निवृत्ती इधाटे (स.शि.)**

म.न.पा.कें.प्रा.शा. मुकुंदवाडी, औरंगाबाद.

# वैज्ञानिक दृष्टिकोन



शाळा सुटली, देवांशी आणि तिच्या मैत्रिणी घरी जाण्यासाठी निघाल्या काही अंतरावर त्यांना बरीच गर्दी दिसली. कशाची गर्दी म्हणून मैत्रिणी सोबत देवांशी गर्दीत घुसली. पाहते तर काय ? एक भोंदू बाबा वेगवेगळे प्रयोग करीत होता. समोर अनेक स्त्रिया केस मोकळे सोडून बसल्या होत्या. अनेक तंत्र मंत्र चालू होते. सगळीकडे धूर पसरला होता.

बशी मधील लाकडाच्या भुशाला तूप टाकून आग लावली. सगळेजण त्रिकालेश्वर महाराज की जय.... त्रिकालेश्वर महाराज की जय ...! असा जयघोष करू लागले. बाबा हातात झाडू घेऊन फुक मारू लागले. तसा जयघोष पुन्हा वाढला. बाबाने एक लिंबू घेतले व म्हणाले, ''या दगडावर मी रक्ताभिषेक करणार आहे''. बाबाने त्याच्याकडील चाकू घेतला व लिंबू कापले त्यातून लाल रक्त पडायला लागले. पुन्हा जयघोष सुरु झाला.

बाबा आता काही बोलणार तोच देवांशी म्हणाली, ''हा बाबा भोंदू आहे. हा आपल्याला फसवीत आहे. ही कोणतीही जादू नाही. हिंमत असेल तर माझ्या जवळील चाकूने ते लिंबू कापा आणि रक्त काढून दाखवा. मीही तुम्हाला असे करून दाखवू शकते. बाबा घाबरला. म्हणाला , ''तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवू नका. मी सांगतो तेच खरे आहे. गर्दीतला एक जण म्हणाला, ''ती म्हणते तर  कापा की तिच्या चाकूने..!'' नाही नाही तुम्ही माझ्या तपस्येत विघ्न आणू नका. बाबा म्हणू लागला. पण आता अनेक जण बोलू लागले. म्हणून बाबा तिथून पळ काढण्याच्या तयारीत होता. सर्वांनी त्याला घेरले व त्याला विचारले, ''खरं सांग.'' पण तो बाबा काही ऐकण्याच्या तयारीत नव्हता. काही जणांनी पोलिसांना


बोलावून घेतले. सर्वांनी त्याला पोलीसांच्या ताब्यात दिले.

देवांशी सगळ्यांना सांगू लागली, लिंबात सायट्रिक आम्ल आणि बाबाने त्याच्या जवळील चाकूला आधीच आम्ल निदर्शक लावलेले होते. ते वाळल्यावर आपल्याला दिसत नाही. त्या चाकूने लिंबू कापले की त्यातील सायट्रिक आम्ल व चाकूला लावलेले आम्ल निदर्शक यांची रासायनिक अभिक्रिया होऊन लिंबाचा रस लाल रंगाचा होतो व आपल्याला ते रक्त असल्याचा भास होतो. तसेच potassium paramagnet आणि glycerin यांच्या रासायनिक अभिक्रियेतून आग पेटविली जाते. गर्दीतील एक स्त्री देवांशीला म्हणाली , ''तुला हे कोणी सांगितले..?''. ती म्हणाली, ''शाळेतील बाईंनी आम्हाला विज्ञानाच्या प्रयोगशाळेत प्रयोग करून दाखविले होते.''

सर्वांनी देवांशीचे कौतुक केले. व यानंतर एकाही बाबावर विश्वास ठेवणार नसल्याचे सांगितले. एकच जयघोष देवांशी की जय ....देवांशी की जय.........!

**तुषार संपत ताठे (स.शि.)**

म.न.पा.प्रा.शा. हर्सूल, नवीन वसाहत, औरंगाबाद.



# जिज्ञासू अनिकेत

मुंबईहून बऱ्याच दिवसांनी अनिकेत आपल्या वडिलांसोबत आजोबांकडे औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील गेवराई या गावी गेला. आजोबांना भेटून अनिकेतला



आनंद झाला. आजोबा आणि पप्पा गप्पा मारीत बसले. आजोबा म्हणत होते, ''ऑगस्ट चा महिना आला तरी पाऊस काही मना–सारखा पडला नाही. मक्याचे पीक तर गेलं, कपाशी हिरवी दिसते. पण ती पण टिकेल असं वाटत नाही. खूप अवघड साल आलं.'' पप्पांनी आजोबाना धीर दिला. आजोबा म्हणत होते की, गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या मराठवाड्यात पावसाचे प्रमाण कमी झाले. अनिकेत शांतपणे ऐकत होता. अनिकेतचे त्याच्या आजोबांवर खूप प्रेम होते. आजोबा असे नाराज झालेले अनिकेतला आवडले नाही.

पप्पा आणि अनिकेत परत मुंबईत आले. पण अनिकेतच्या मनात त्याच्या आजोबांची काळजी सतत घोळत होती. दुसऱ्या दिवशी शाळेत गेला. शिक्षकांना त्याने प्रश्न विचारला, ''सर, आपल्याकडे मुंबईत खूप जास्त पाऊस पडतो. माझे आजोबा मराठवाड्यात राहतात. तिथे गेल्या काही वर्षांत पावसाचे प्रमाण खूपच कमी का झाले ?''

शिक्षकांना अनिकेतचा प्रश्न समजला. त्यांनी अनिकेतला सांगितले, मराठवाडा हा पर्जन्यछायेचा प्रदेश आहे. पर्जन्य छायेचा प्रदेश म्हणजे काय सर? अरे आपण बाहेर मैदानात गेलो की आपली सावली कोठे पड़ते? सूर्याच्या विरुद्ध दिशेला सर. अगदी बरोबर. तसेच पावसाचेदेखील आहे. नैऋत्य मोसमी वारे हिंदी महासागर अरबी समुद्रामार्गे उभ्या असलेल्या सह्याद्री पर्वताना आडतात. त्याच्या विरुद्ध बाजूला पाऊस कमी पडतो. आणि याच भागात मराठवाडा आहे. म्हणून तिथे पाऊस कमी पडतो. आणि विकासाच्या नावाखाली अनेक झाडे कापण्यात आली. पण नवीन झाडे लावण्यात आली नाही. पाऊस

पडण्यासाठी झाडांचे प्रमाण जास्त पाहिजे. आणि मराठवाड्यामध्ये वनांचे प्रमाण कमी आहे. म्हणूनदेखील मराठवाड्यात पाऊस कमी पडतो. जागतिक तापमानात वाढ झाल्यामुळे पावसाचे नैसर्गिक चक्रच बदलून गेले आहे. पण सर आता तिथे पाण्याची समस्या सोडविण्यासाठी काय केले पाहिजे ? सर्वांनी खूप झाडे लावली पाहिजे. जितका पाऊस पडतो ते पाणी जास्तीत जास्त आडवले व साठवले पाहिजे. पाण्याचा काळजीपूर्वक वापर केला पाहिजे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. तरच आपण दुष्काळावर मात करू शकतो.

अनिकेतने आपल्या आजोबांना सर्व सांगितले. सर्व गावकऱ्यांनी मिळून जास्तीत जास्त पाणी अडविण्याचे ठरविले. पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे ठरविले. अल्पावधीतच गाव हिरवेगार झाले. जनावरांच्या चाऱ्याची व पाण्याची समस्यादेखील सुटली. अशा प्रकारे त्यांनी दुष्काळावर मात केली. अनिकेत पुन्हा काही वर्षांनी आजोबांना भेटायला गेला. आजोबांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून अनिकेतला खूप हायसे वाटले.

**तुषार संपत ताठे (स.शि.)**

म.न.पा. प्रा.शा. हर्सुल, नवीन वसाहत, औरंगाबाद



# गट्टी माझी शाळेशी

छोटा राजू छानसा, चुणचुणीत मुलगा. आज पहिल्याच दिवशी राजू नवीन शाळेत आला. नवा गणवेश, नवीन दप्तर, नवीन बूट, सगळेच नवीन घालून वॉटरबॅग सांभाळताना त्याचा गोंधळ उडाला. सगळ्यांचे आई-बाबा गेटमधून मुलांना सोडून टाटा करत होते.



सगळ्या मुलांचे चेहरे भीतीने घाबरले. बाईंनी मुलांना त्यांच्या वर्गात नेऊन जागेवर बसविले. आपल्याला आता एकटे बसावे लागणार, असे सर्वांना वाटले.

पहिल्या वर्गाच्या मॅडम मुलांसमोर आल्या. त्यांनी मुलांना टाळ्या वाचवून चुटकी वाजवण्यास सांगितले. आता मुलांच्या चेहऱ्यावर थोडे हसू आले.

वर्गाबाहेर रांगेत एकानंतर एक जाण्यासाठी मुलांना उभे केले. मैदानात लावलेले रंगीबेरंगी फुगे, पताका, फुलझाडे, रांगोळ्या काढलेल्या बघून राजूला वाटले, ''आता आपल्याला केक कापण्यास सांगणार.''

शाळेच्या मोठ्या मॅडमनी सगळ्यांना जवळ बोलावले. मुलांना त्यांचे नाव सांगण्यास सांगितले. राजूने त्यांना पटकन आपले नाव 'राजू' सांगितले. अरे शाळेत तुझे नाव 'राजन' आहे, असे मॅडमने सांगितले.

सर्वांना चॉकलेट व गुलाबाचे फुल देऊन उड्या मारण्यास सांगितले.

राजूच्या शिक्षिका राधिका मॅडमनी सर्वांना गोलाकार बसवून खूप खेळ घेतले. खूप हसायला लावले.

शाळा सुटण्याआधी राधिका मॅडमने छानसे बडबडगीत शिकवल्याने सगळी मुले

आनंदाने नाचत होती. शाळा सुटण्याची घंटा झाल्याबरोबर आपल्या आईवडिलांना बघून मुले धावतच सुटली.

खूप वेळ झाला तरी राजूचे बाबा त्याला नेण्यास आले नाही. राजू घाबरला होता. राजूच्या शिक्षिकेने त्याला जवळ बसवून घेतले. त्यांच्या बाबांना फोन केला.

एका अनोळखी व्यक्तीने बाबांचा फोन उचलून त्यांचा अपघात झाला आहे असे सांगितले. शिक्षिकेने अपघाताचे ठिकाण विचारून राजूच्या आईला कळविले.

राजूचा चेहरा रडवेला झाला. राजूला त्यांनी खाण्यास खाऊ देऊन राजूला त्याच्या घरी घेऊन आल्या.

सुमारे तीन तास राजूच्या शिक्षिका राजूला सांभाळत होत्या. त्यांनी राजूला, बाबांना डॉक्टरकडे घेऊन जावे लागले असे सांगितले.

राजूची आई घरी आली. राजूला बघून ती रडू लागली. शिक्षिकेने समजूत काढून, बाबा लवकर बरे होतील असे सांगितले.

दुसऱ्या दिवशी '' आज मी लवकर शाळेत जाऊन, माझ्या शिक्षिकेसोबत छान खेळ खेळणार आहे.'' राजूची शाळेची ओढ बघून आई मनोमन सुखावली.

राधिका मॅडमचे राजूच्या आई-बाबांनी खूप आभार मानले.


**सोनाली भास्करराव जोशी (स.शि.)**

म.न.पा.कें.प्रा.शा.सिडको, एन-१२, औरंगाबाद.




# एका होतकरू मुलाची गोष्ट



औरंगाबाद शहरातील गोष्ट आहे. महानगरपालिकेतील एका शाळेत एक मॅडम नव्याने रुजू झाल्या होत्या. त्या नवीन असल्यामुळे आनंदात होत्या. मुलेही मॅडमला भीत नव्हती, आदर करत होती. मात्र त्याचं अभ्यासात लक्ष नव्हतं. मॅडम शिकवायला लागल्या की, ते काहीतरी दुसऱ्याच गोष्टी करत बसायचे. सर्व जण मिळून मॅडमला शिकवू देत नव्हते. मॅडमने विचार केला काय करावे बरे ? काहीही सुचत नव्हते, मग मॅडमने काही दिवस फक्त त्यांच्याशी गप्पाच मारल्या. मराठीविषयी बोलायचे. चित्रपटविषयी बोलायचे, गाणे म्हणणे, कविता म्हणणे, गाण्यांच्या भेंडया खेळायच्या असे करत-करत त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाकडे आणले, तरीपण विद्यार्थी हे नाक मुरडतच अभ्यास करायचे.

हळूहळू सर्व मुले दिलेला अभ्यास पूर्ण करत होते. पण तीन मुले अशी होती, त्यांचे लक्ष अभ्यासात लागत नव्हते. याचे काय कारण आहे हे शोधण्याचा निश्चय मॅडमने केला. त्या तीन मुलांना जवळ घेऊन दररोज गप्पा करत असत. मुले ही गाणी, कविता गोष्टी यांमध्ये रमत असत मुले तेव्हा अगदी खुलून बोलायची, खेळायची पण अभ्यास म्हटले तर काहीही अभ्यास करत नसत. आदित्य,



रोहित, प्रांतक हे शाळा सुटली की दप्तर घरात टाकायचे आणि गल्ली बोळात फिरायचे. कधी कचरा वेचायचा आणि तो विकून त्याचे पैसे घ्यायचे व त्याचे काहीतरी घेवून खायचे. असा त्यांचा रोजचा कार्यक्रम असायचा. ते शाळेतही कधीतरी यायचे. त्यामुळे मॅडमही त्यांना नीट शिकवू शकत नव्हत्या. एक दिवस मॅडमने रोहितला बोलावले आणि म्हणाल्या, ''तू किती दिवस झाले शाळेत आला नाहीस तेंव्हा रोहित रडायला लागला. मॅडमने विचारले ''तुला काय झाल रडायला ?'' त्याने सांगितले माझ्या पायाला जखम झाली आहे मॅडम. मॅडम म्हणाल्या, ''कुठे आहे जखम ?'' तो म्हणाला, ''मॅडम मी दाखवू शकत नाही.'' मॅडम म्हणाल्या दाखव, ''मी तुझ्या आईसारखी आहे.'' त्याने जखम दाखवली तर त्याच्या मांडीला पाठीमागून पंज्याइतके जळालेले दिसले. मॅडमला धस्स झाले. कशाने झाले ? असे विचारले तर त्याच्या वडिलांनी त्याला चटका दिला होता. त्याचे वडील आई दोघेही काम करीत होते. पण वडील दारु पीत असत, त्यामुळे कामाचे पैसे पुरत नव्हते. म्हणून मुलांना कामाला लावत होते. त्या दिवशी भावाभावांत गमतीजमती मध्ये भांडण झाले आणि ते वडिलांनी पाहिले. काहीही विचार न करता मी मोठा म्हणून मला खूप मारले व चटका दिला नंतर शेजाऱ्याने दवाखान्यात नेले म्हणून मी १५ दिवस शाळेत आलो नाही असे त्याने सांगितले.

मॅडमला खूप वाईट वाटले म्हणून त्या रडत होत्या नंतर रोहितच मॅडमला समजावू लागला, 'मॅडम, रडू नका. आता मला बरे वाटत आहे. मी रोज शाळेत येईल व रोज अभ्यास करील.' असे म्हणत असताना तो ही रडत होता. मॅडम आणि रोहित थोडावेळ तसेच राहिले व हळूहळू शांत होत मॅडम त्याच्याशी बोलू लागल्या, 'तू काय काम करतोस ?' रोहित म्हणाला, 'मी हॉटेलवर काम करतो, रोजाने कधी जातो कधी नाही'. मला घरी भावांनापण सांभाळावे लागते. त्यामुळे मला अभ्यास करता येत नाही. बाई, मी लहानपणीपासून काम करतो आणि माझ्या भावांना सांभाळतो म्हणून मला शाळेतलं काहीच येत नाही. मला घरी वेळच मिळत नाही. मला खेळायचे असते पण आई



कधी खेळू देत नाही तर कधी काम सांगते. माझी बहीण आईसोबत भांडी कामाला जाते, म्हणून मी घरातील भांडी घासतो व झाडून काढतो.'

मॅडम म्हणाल्या, ''एवढे काम करतो तर खेळतोस केव्हा?'' तो म्हणाला, 'गुपचूप खेळायला जातो?' मॅडमने विचारले, 'मित्रासोबत ही फिरायला जातोस ना ?' रोहित म्हणाला,'हो जातो ना ! कधी कधी.' मॅडम म्हणाल्या, 'कधी पासून काम करतो ?'. रोहित म्हणाला, 'मी लहान असल्यापासून काम करतो. मला आठवत पण नाही कधीपासून काम करतो.' मॅडम विचारात पडल्या जर या मुलाला एवढे काम आहे घरची. परिस्थती बिकट आहे. वातावरण असे आहे. मित्र असे आहेत तर राहित कसा अभ्यास करतो? रोहितसाठी काय करता येईल याचा विचार त्या करु लागल्या. खूप विचार केल्यावर त्यांनी मनात काहीतरी ठरवून समाधानाने डोळे पुसले. स्वतःचा चेहरा पुसला आणि रोहितला म्हणाल्या, ''रोहित तू रोज माझ्याजवळ बस. आणि मी तुला सांगेल ते काम करायचे, मी तुला दहा रुपये देईल. सगळ्यांना रोज शाळेत घेऊन ये. थोडा उशीरा आलास तरी चालेल, पण सर्वांना घेऊन शाळेत येत जा' रोहित आनंदाने ''हो'' म्हणाला आणि रोज शाळेत येऊ लागला.

तो कधी कधी येत नव्हता. मॅडम तरीही त्याला रोज पैसे देत असत आणि रोज आल्यामुळे त्याला मुळापासून शिकवले. त्याला हळू हळू वाचता येऊ लागले,तो गणित करु लागला. इंग्रजीची भीती कमी होऊ लागली. परिपाठातही चांगल्या प्रकारचा सहभाग घेऊ लागला. नीटनेटका येत असल्यामुळे बाकीच्या मुलांना तो आवडू लागला,तो रोज आत्मविश्वासाने काहीतरी परिपाठात सादरीकरण करत असे. अशा प्रकारे तो सर्वांना आवडू लागला. मॅडमच्या सहकार्यामुळे एका मुलाच्या जीवनाला सन्मार्ग मिळाला.

**सिंधू बाबूराव डिघुळे (स.शि.)**

म.न.पा. प्रा. व मा. शाळा, बन्सीलालनगर, औरंगाबाद.

# पेन्सिलीची पंचसूत्री

उमेश राठोड वर्गातील अतिशय हुशार मुलगा, पण तित्काच खट्याळ – मस्तीखोर. त्याची तक्रार कोणी केली नाही असा एक दिवसही गेला नाही. एकदा तर त्याने एका मुलाच्या हातात टोकदार पेन्सिल जोरात टोचली, त्याच्या हातातून रक्त वाहू लागले. तक्रार मुख्याध्यापकांपर्यंत गेली. मुख्याध्यापकांनी उमेशच्या पालकांना बोलावून घेतले. त्यांचे शाळेतून नाव कमी केले. त्यांची सगळी हुशारी फुकट गेली. आई–वडील, मित्र, शेजारी साऱ्यांना तोंड दाखवायची लाज वाटू लागली. पण आता करणार काय ? चूक तर झाली ! या गोष्टीचा त्याला खूप पश्चाताप झाला होता. भविष्याची चिंता सतावू लागली. विचार करता करत अचानक त्याचा डोळा लागला.

स्वप्नातही त्याला तेच दृश्य दिसू लागले. कोपऱ्यात पडलेली 'ती, पेन्सिल त्यांच्याजवळ येउन त्याच्याशी मनुष्यवाणीने बोलू लागली, ''उमेश, तू एवढा हुशार मुलगा, मग अशा चुकीच्या मार्गाने का गेलास बाळा ? बघितलसं ना हुशारी कमवायला किती वेळ लागतो आणि ती घालवायला मात्र एक क्षणही पुरेसा ठरतो. माणसाने नेहमी शांत, संयमी आणि सहनशील राहावं म्हणजे पश्चातापाची वेळ कधीही येत नाही. माझ्याकडे पहा, मी स्वतः झिजून स्वत: ला समाप्त करुन टाकते; पण कागदावरील अक्षरच्या रूपाने, चित्रांच्या रूपाने इतरांना सदैव आनंद आणि प्रेरणा देण्याचे काम करते. म्हणूनच मी तुला जे पाच सूत्र सांगते ते नीट ध्यानात ठेवा.



१. जसे, माझ्या साहाय्याने तुम्ही मुलं सुंदर आकृती, नकाशे, विविध चित्र काढता, तसं तुझ्यातल्या विविध सद्गुणांचा उपयोग इतरांनाही व्हावा, यासाठी सदैव तयार राहायला हवेस.

२.	मला शार्पनर किंवा लेडने टोकदार बनवता. त्यावेळी मला अनंत यातना होतात; पण तुमच्या आकृत्या अचूक येतात यासाठी मी ते सहन करते. स्वत: झिजते, तसे तुम्हीसुद्धा इतरांच्या उपयोगी पडताना कितीही त्रास झाला तरी तो सहन करायला शिका. परोपकार हेच जीवनाचे उद्दिष्ट असावे.

३. माझ्याकडून अनेक चुका होतात. पण त्या खोडरबरने लगेच खोडून दुरुस्त करता येतात. त्याप्रमाणे तूदेखील नकळत का होईना चूक झाली तरी क्षमारूपी खोडरबरने ती चूक पुसून टाक. चांगल्या सवयीचं जीवनाच्या पटलावर रेखाटन करावे. मागील अनुभव लक्षात घेऊन त्याचं त्या चुका टाळण्याचा प्रयत्न कर. चुका कधीही तशाच ठेवायच्या नसतात. त्या ताबडतोब दुरुस्त करण्यातच खरं शहानपण आहे.

४.	मी जशी आत आहे, तेच बाहेर प्रकट करते. तसे माणसाने आत बाहेर एक असाव ंदिखावा किंवा बनावट जीवन असू नये.

५.	मी ज्या कागदावरून वाटचाल करते तिथे तिथे माझ्या अस्तित्वाच्या खुणा उमटतात. तसं आपलं स्वतःचं असं स्थान आपण स्वप्रयत्नाने निर्माण करावं.

उमेश मला वचन  दे, ''या गोष्टी तू नक्कीच जीवनात धारण करशील.''

उमेश पेन्सिलीची पाच सुत्रे ऐकून अतिशय भारावून गेला. त्याने पेन्सिलीला वचन देत म्हटले, अगदी मनापासून मी त्याचे पालन करीन. पण एक अडचण आहे.

''कसली अडचण ?''

''मला तर शाळेतून काढून टाकलंय..''

उमेश, तुला तुझ्या गोष्टींचा खरंच पश्चाताप झालायं ना ? मग, असाच जा. मुख्यधापकांच्या पायावर डोकं ठेवून क्षमा माग हवं तर त्यांना यापुढे मी कधीही अशी चूक करणार नाही, असं लिहून दे. ते नक्की क्षमा करतील.' उमेश उठला. त्याला जणू एक नवी दिशा आणि बळ लाभलं होतं. दप्तर घेऊन तो शाळेच्या दिशेने चालू लागला. एक आत्मविश्वास घेऊन....

**बी. आर. राठोड़ (स.शि.)**

म.न.पा. कें. प्रा. व मा. वि. प्रियदर्शनी इंदिरानगर, औरंगाबाद

# आत्मबल

ही गोष्ट आहे दोन मुलांची, जी एका गावात राहत असतात. त्यांपैकी एक सहा वर्षांचा असतो आणि दुसरा दहा वर्षांचा दोघेही खूप छान मित्र असतात. एकाच शाळेत शिकत असतात. घट्ट मैत्री असते दोघांमध्ये, अगदी आपल्या शोले चित्रपटातल्या जय आणि विरू–सारखी मैत्री असते.

एके दिवशी सहज खेळत – खेळत ते दोघं जरा गावापासून दूर जातात. त्यांच्या लक्षातपण येत नाही की, आपण गावापासून खूप दूर आलोय. एका ठिकाणी त्यांना विहीर लागते. तहान लागलेली असल्यामुळे दोघेही त्या विहिरीकडे पाणी पिण्यासाठी जातात. विहिरीवर कप्पीला पाण्याची बादली बांधलेली असते. साहजिकच जो मोठा मुलगा असतो तो पाणी काढण्यासाठी बादली घेऊन रहाटाच्या साह्याने पाणी काढण्याचा प्रयत्न करतो. अचानक दोघेही प्रचंड घाबरतात. आणि रडायला लागतात. आरडा–ओरडा सुरू करतात. मदतीसाठी हाका देतात. पण ते आधीच गावापासून खूप दूर आलेले असतात. त्यामुळे जवळपास एकही माणूस त्यांना दिसत नाही.



जो लहान मुलगा असतो. तो आता खूप चिंतेत पडतो. सुरुवातीला त्याला काय करावे? काही सुचत नाही. शेवटी काही तरी प्रयत्न करायचे म्हणून त्याने प्रयत्न करायला सुरुवात केली. जी बादली पाण्यात पडलेली असते त्याने ती त्याच्या मित्राला पकडायला सांगितली. पूर्ण ताकद पणाला लावून त्याने ती दोरी ओढायला सुरुवात केली. खूप



जिद्दीने, चिकाटीने कोणताही विचार न करता रहाट ओढू लागला आणि जोपर्यंत आपला मित्र वर येत नाही तोपर्यंत त्याने प्रयत्न सुरू ठेवले.

शेवटी त्याच्या प्रयत्नाला यश मिळाले. आणि त्याचा मित्र सुखरूप विहिरीतून बाहेर आला. जसा तो वर आला तसे त्या दोघांनी एकमेकांना कडकडून मिठी मारली. आणि दोघांच्याही जीवात जीव आला.

दोघा मुलांनी झालेला सगळा प्रकार गावकऱ्यांना सांगितला. पण विश्वास मात्र कुणाचाच बसेना कारण वयाने एवढ्या लहान सहा वर्षांच्या मुलांने एवढं साहसाचं काम करणे शक्यच नाही. अशक्यच ! सहा वर्षाच्या मुलामध्ये पाण्याने भरलेली बादलीदेखील विहिरीतून काढणे शक्य नाही आणि इथे तर एवढ्या मोठ्या मुलाला त्याने बाहेर काढले. इतकी ताकद त्या मुलांमध्ये कशी येणार, म्हणून दोघांच्याही बोलण्यावर कुणी विश्वास ठेवत नव्हते. पण... एक व्यक्ती असा होता ज्याचा त्या मुलांवर विश्वास होता. त्यांना रहीम आणि वयस्कर चाचा होते. गावात त्यांचा आदर होता.

सगळ्या गावकऱ्यांनी त्यांना विचारलं, अस कसं घडेल ? जी गोष्ट शक्य नाही त्यावर तुम्ही विश्वास ठेवताय. आणि मुलं खरं बोलताय अस म्हणायचं आहे का तुम्हाला ? त्यावर रहीम चाचांनी उत्तर दिले की, ''मी तर जे काही घडलं त्या ठिकाणी नव्हतो, मलादेखील काही माहित नाही, तिथे काय आणि कसं तर बालमित्रांनो, सांगायचं तात्पर्य एवढंच की, इतरांच्या बोलण्याकडे, नकारात्मकतेकडे, टीकाकारांकडे लक्ष न देता पूर्ण शंभर टक्के आत्मविश्वासाने प्रयत्न केल्यास यश नक्कीच मिळते. तुमच्या लक्ष्यापासून तुम्हाला दूर करणाऱ्यांकडे लक्ष न देता, सतत प्रयत्न करणे हीच यशाची गुरुकिल्ली आहे !

प्रश्न हा नाही कि एवढ्या की, एवढ्या लहान मुलाने कसं शक्य केलं ? प्रश्न हा आहे

की, त्याने हे कसं शक्य करून दाखवलं? एवढी शक्ती त्या लहान मुलामध्ये आली कुठून? आणि याच फक्त आणि फक्त एकच उत्तर आहे. ते म्हणजे ज्यावेळी ही घटना घडत होती, त्याचे प्रयत्न सुरू होते. त्यावेळी त्याला तिथे सांगणार कुणीच नव्हतं की, तू हे करू शकत नाही त्याच्या प्रयत्नाला मागे ओढणार तिथे कुणी नव्हतचं, त्यामुळे त्यांच्या मनात ही सकारात्मकता होती ती कायम स्थिर होती. आत्मविश्वास डगमगला नाही. ही आत्मशक्ती त्याच्या मनात होती की, काही झाले तरी आपण हे करणार आणि मित्राला वाचवणार एवढचं फक्त त्याच्या डोक्यात होतं आणि त्याने ते साध्य करून दाखवलं त्यामागे एकच शक्ती होती, ती म्हणजे त्याचा आत्मविश्वास.

इकडे गावात सगळे घाबरले. विशेषत: त्या दोघांचे आई–वडील सगळीकडे शोधाशोध सुरू झाली. हे दोघे मित्रदेखील घाबरले. कारण आता आपापल्या खूप मार मिळणार असे त्यांना वाटू लागले. शेवटी ते परत गावात पोहचले, तोपर्यंत सगळे गावकरी जमा झालेले होते. त्या दोघांना बघताच सगळ्यांचा जीव भांड्यात पडला. सगळ्यांना आनंद झाला. त्याची आई मुलांच्या गळ्यात पडून रडू लागली. नंतर सर्व वातावरण शांत झाले.

सगळ्यांना रहीम चाचाचं म्हणणं पटलं आणि सगळ्यांनी त्या मुलांचं भरभरून कौतुक केलं आणि शाबासकी देऊन त्यांची पाठ थोपटली. त्या मुलालादेखील खूप आनंद झाला. दोघांचाही आनंद ओसंडून वाहत होता.

**शालिनी ज्ञानदेव शेळके (स.शि.)**
म.न.पा. नूतन माध्य. शाळा ज्युबली पार्क, औरंगाबाद.

# निश्चय करा, यश तुमचेच !




''सखा, शाळेत जातो की नाही?'' रामने बाजेवर पडल्या-पडल्या ओळखून सखारामला विचारले. सखारामला आज शाळेत न जाता कामावर जायचे होते. आई वडील दोघेही मोजमजुरी करून कुटुंब चालवत होते. आतापर्यंत शाळेला सुटी होती म्हणून सखारामही कामावर जायचा. काही दिवस वडील आजारी असल्याने अंथरुणाला खिळून होते. आई कामावर गेली होती. सखारामला आज काम बुडवून चालले नसते. कारण आता आईची एकटीचीच मजुरी मिळणार होती. त्याने दिवस कसा भागणार?

''बाबा, मला शाळेत जायचे नाही , तुम्ही आजारी, आई एकटी कशी सर्व करणार? आपलं घर कसं चालणार?''

यावर राम समजावणीच्या सुरात सखारामला म्हणाला, 'सखा, अरे जेवायचं तर रोजचंच आहे. एखादे वेळी कमी जेवलं म्हणून काय बिघडलं ? पण आम्हाला जास्त शिकता आलं नाही. तू तरी शिक. तू जर शिकून मोठा झाला तर हेही दिवस जातील. नाहीतर तू ही आमच्यासारखी मजुरी करायला लागला तर कायम हेच दिवस आपल्याला बघावे लागतील. तेव्हा लेका, जा तू शाळेत. शाळा बुडवू नकोस.''

नाइलाजाने सखाराम शाळेत जायला निघाला. सखाराम फार हुशार नव्हता. पण त्याला चांगले मार्क पडत असत. काही विषय त्याला अवघड जायचे. परंतु परिस्थितीमुळे त्याला क्लास लावता येत नव्हता. आता त्याचे दहावीचं वर्ष होतं. नाही म्हटले तरी त्यात दहावीचं टेन्शन आलं होतं. त्यात त्याला कळलं की या वर्षी देशपांडे नावाचे नवीन सर वर्गात येत आहेत. वर्गातही तो इतर मुलांबरोबर फार मिसळायचा नाही. त्याला एक प्रकारचा

न्यूनगंड . आपण त्यांच्यासारखे नाही. आपल्यात काहीतरी कमी आहे. शिवाय त्याचे मधले एक –दोन वर्ष वाया गेल्यामुळे इतर मुलांपेक्षा त्याचं वयही जास्त होतं.

देशपांडेसरांना अनामिक हूरहूर लागून राहिली होती. नवीन शाळा नवीन येणारी मुलं कशी असतील? आपलं शिकवण त्यांना समजेल का? ते कसा प्रतिसाद देतील? असे एक ना अनेक प्रश्न त्यांच्या मनात होते. खरं तर गेली २५ वर्षे देशपांडे सर शिकवण्याचे काम करतात. यावर्षी त्यांची बदली झाली होती. पूर्वीच्या शाळेत त्यांच्या तासाला मुले अगदी मन लावून शिकत होती. त्यांचे शिकवणे म्हणजे पुस्तकाबरोबरच पुस्तकाबाहेरचेही. विद्यार्थ्यांनी पुस्तकातला धडा अनुभवावा असा त्यांचा प्रयत्न असतो. त्या धडयाच्या अनुषंगाने इतरही अवांतर माहिती ते विद्यार्थ्यांना देत असत. त्यांच्या वर्गातल्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या या प्रगतीकडे त्यांचे लक्ष असे. एखादा विद्यार्थी अभ्यासात मागे पडत असेल तर त्या विद्यार्थ्यांच्या पालकांना बोलावून त्यांना त्याची जाणीव देत असत आणि स्वतः त्या विद्यार्थ्याला वैयक्तिक मार्गदर्शन करीत असत. त्यामुळे सगळ्या शाळेत ते विद्यार्थिप्रिय शिक्षक होते. तरीही यावर्षी नवीन शाळेत सुरुवात होताना त्यांना थोडी हूरहूर लागली होती.

शाळेचा पहिला दिवस, वर्गातल्या सगळ्या विद्यार्थ्यांचा परिचय त्यांनी करुन घेतला. देशपांडे सरांची एक पध्दत होती. त्या पध्दतीने त्यांनी वर्गात मुलांना प्रश्न विचारला, ‘मुलांनो तुम्हाला आयुष्यात कोण व्हायचं आहे? एकेकांनी सांगा. प्रत्येक विद्यार्थ्याने त्याला काय व्हायचे ते सांगायला सुरुवात केली. कोणाला डॉक्टर, कोणाला इंजिनिअर, कोणी आर्किटेक्ट तर कोणाला संशोधक व्हायचं होतं. सखारामची पाळी आली, तो उठेचना. गप्प बसून राहिला, ‘‘अरे बाळ, ऊठ, नाव काय तुझे?’’ तरीही तो गप्प. सर त्याच्याजवळ गेले. सरांना पाहून तो जागेवरुन ऊठला खरा. पण काही बोलचेना. सरांनी त्याला बोलतं केलं ! काय व्हायचंय तुला?’’ अडखळत सखराम म्हणाला, सर, मला मोठा कारखाना काढायचाय सगळे मोठ्याने हसले, ‘‘असे, हसता कशाला?’’, ‘‘सर, त्याचे आई वडील मजुरी करतात’’, गणेशने ही माहिती दिल्यावर सखारामचे डोळे भरून आले. सरांना लक्षात आलं. सर म्हणाले, ‘‘मुलांनो, या जगात अशक्य काही नाही. अनेकांनी शून्यातून मोठे विश्व निर्माण केले आहे. आज मोठे कारखानदार आहेत. त्यांची चरित्रे वाचा. ते लहानपणी कोणी नव्हते. परंतु आज ते लाखोचे पोशिंदे झाले आहेत. त्यांनी मोठे मोठे कारखाने काढले आहेत.

सखाराम म्हणतो ते काही खोटं नाही. त्याने मनात आणलं आणि प्रयत्न केले, तर तो त्याचा नक्कीच मोठा कारखाना काढील. त्याच्यावर हसण्यापेक्षा तुम्ही त्याचे मित्र आहात, त्याला तुम्ही मदतच केली पाहिजे.'' सरांच्या या बोलण्याने सखारामला थोडा धीर आला. नकळत देशपांडेसरांनी त्याच्या मनात घर केलं.

देशपांडेसरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधायला सुरुवात केली. ''मुलांनो, आता तुम्ही प्रत्येकाने तुम्हाला आयुष्यात काय व्हायचं आहे, ते सांगितलं. आता ते तुमच्या वहीवर ठळक अक्षरात लिहा. घरी गेल्यावर एक मोठा कागद घेऊन त्यावर तुमचे ध्येय लिहा आणि ते भिंतीवर चिकटवा. त्यामुळे जाता येता तुम्हाला तुमच्या ध्येयाची जाणीव राहील. परंतु, यावर्षी तुमचे १० वी चे वर्ष आहे. आता तातडीचे ध्येय म्हणून अभ्यासाकडे लक्ष द्या. खूप महत्त्वाचे वर्ष आहे. शाळेच्या पहिल्या दिवसापासून अभ्यासाला लागा असे तुमच्या पालकांनी सांगितले असेल, ज्या काही अभ्यासासाठी आवश्यक गोष्टी असतील त्या जरूर करा. परंतु आतापासूनच कोणतेही दडपण घेऊ नका. एक मात्र नक्की, तुमच्या मनाचा निश्चय झाला नाही, तर तुम्ही अभ्यासही करू शकणार नाही आणि केलेला अभ्यास तुमच्या लक्षातही रहाणार नाही. त्यामुळे पहिल्यांदा तुम्हाला तुमच्या मनाचा पक्का निश्चय करावा लागेल, त्यानंतर प्रयत्न अणि प्रयत्नात सातत्य राखावे लागेल. आज आपण सगळे मिळून तुमच्या यशाचा निश्चय करणार आहोत. आता माझ्या मागे तीन वेळ सगळ्यांनी म्हणा, ''मी यश मिळवणारच''. सगळ्या विद्यार्थ्यांनी चढ्या आवाजात या निश्चयाचं उच्चारण केलं. एक वेगळाच आत्मविश्वास सगळ्यांच्या मनात निर्माण झाला.

देशपांडेसरांची शिकवण्याची एक पध्दत होती. विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेत ते शिकवित असत. जरी एखाद्याला विषय अवघड जात असेल, अभ्यासात एकाग्रता नसेल तर, अभ्यासात एकाग्रता वाढविण्यासाठी बुध्दिवर्धन पध्दत ते विद्यार्थ्यांना शिकवत. शाळा सुटल्यावर ज्यांचा जो विषय अवघड जात असे,अशा विद्यार्थ्यांना थांबवून त्यांच्याकडून बुध्दिवर्धन पध्दतीने अभ्यास करवून घेत. एकाग्रतेचे प्रयोग करवून घेत. अशा विद्यार्थ्यांमध्ये सखारामही सामील झाला. हळू हळू त्याच्या मनावरचं दडपण कमी होऊ लागलं. त्याचं मन अभ्यासात रमायला लागलं. देशपांडेसरही त्याला आपलेपणाने शिकवीत असत. आपण मागे नापास झालो याची खंत त्याला जाणवत होती. हे एकूण देशपांडेसर म्हणाले, ''अरे, एक

परीक्षा नापास झाल्याने संपूर्ण आयुष्य नापास होत नाही. परीक्षा ही त्या वेळेची आयुष्यात पुढे जाण्याची संधी असते. ती ज्याला साधते तो पास होतो. ज्याला साधत नाही तो नापास होतो. म्हणून काही फार मोठा डोंगर कोसळला असे होत नाही.''

''मागचे सगळे विसरुन जा. यावर्षी प्रयत्न कर. नक्कीच चांगल्या मार्कांने पास होशील. हळूहळू सखारामची प्रगती होत होती, त्याला आपण काहीतरी करू शकू याचा आत्मविश्वास निर्माण होत होता. सखाराम १० वी चांगल्या मार्कांने पास झाला. पेढे घेऊन तो व त्याचे आई वडील देशपांडेसरांकडे गेले. ''सर, तुम्ही होता म्हणून सखाराम चांगल्या मार्कांनं पास झाला. तुमच्याबद्दल खूप चांगलं सांगत असतो.''

''अहो, मी काहीच केलं नाही. अभ्यास त्याने केला. चांगल्या मार्कांने पास व्हायचं त्यानेच ठरवलं. त्याने काहीच ठरवलं नसतं, तर मी कितीही चांगलं शिकवलं तरी तो पास झाला नसता. त्याच्या मनाच्या निश्चयाने त्याला यश दिले. मी फक्त त्याला अभ्यासात मदत केली. मग काय, सखाराम तुला पुढे काय व्हायचंय?''

''सर, मला मोठा कारखाना काढायचांय'' सखारामने त्याचा निश्चय पुन्हा बोलून दाखवला.

''अरं लेका, येडा का खुळा? आपल्याला कसं जमायचं?''

या वाक्याला मधेच तोडत देशपांडेसर म्हणाले, ''अहो, तुम्ही काही काळजी करू नका. सखाराम मोठा कारखाना काढणारंच, याची मला खात्री आहे. पण सखाराम, नुसता निश्चय काही कामाचा नाही. त्याला प्रयत्नांची जोड आणि त्यात सातत्य लागेल, तरच तू यशाच्या शिखरापर्यंत पोहचू शकशील. हो सर, नवकीच मी प्रयत्न करेन. मला कारखाना काढून काही प्रमाणात तरी लोकांना रोजगार मिळवून द्यायचा आहे. त्यांची गरिबी कमी करायची आहे. तुमचा आशीर्वाद असू द्या. असं म्हणून सखाराम सरांच्या पाया पडला, आई–वडिलांच्या पाया पडला.

''अरे, माझे आशीर्वाद आहेतच. तुला केव्हाही वाटलं तरी मी कायम मदत करायला तयार आहे. परंतु एक लक्षात ठेव. तुझं आयुष्य नदीसारखं प्रवाही राहू दे. कितीही अडथळे आले तरी नदीचं काही डबक होत नाही. अडथळ्याला पार करुन आजूबाजूच्या लोकांना समृध्द करून नदी सागराला मिळते. तसंच तुझं आयुष्य असू दे. आयुष्यातील अडथळ्यांना पार करून चांगलं यश मिळव. परंतु हे करत असताना आजूबाजूच्या गरजूंना मदत करण्याचे

व्रत मात्र तू विसरु नको. सखारामने सरांच्या या विश्वासाचे सार्थक करण्याचे ठरवलं. तो मनात म्हणाला, ''प्रत्येकाला असे देशपांडेसर मिळाले तर त्यांचे आयुष्य उजळून येईल.'' देशपांडेसरांमुळे आणि केलेल्या निश्चयामुळे सखारामच्या आयुष्याला एक नवं चांगलं वळण मिळालं. त्याचं आयुष्य प्रवाही झालं.

अनिता नामदेव सोनार (स.शि.)

म.न.पा. प्रा.शा., बडीगिरणी, औरंगाबाद.



# बोलणारे झाड



समीर आणि त्याचे मित्र लपंडाव खेळत होते.

खेळ चांगला रंगला होता.. समीर एका वडाच्या झाडामागे लपला. आरुष त्याला शोधत होता. समीर थकल्यामुळे वडाच्या पाठीमागे खोडाच्या पायथ्याशी बसला.

''दमलास का?'' असा मोठा आवाज त्याच्या कानावर पडला. समीर इकडे तिकडे पाहू लागला. त्याला आवाज कुठून आला काही कळेना. त्याने आजूबाजूला पाहिले पण कोणीच नव्हते.

''बस जरा सावलीत. तुला बरे वाटेल'' पुन्हा असा मोठा आवाज आला. समीर मात्र आता घाबरला. त्याला काय करावे काही सुचेना. तो धावत सुटला...तोच ''थांब'' असा मोठा आवाज आला.

''घाबरू नको, मी बोलतोय वडाचे झाड'' समीरचा विश्वास बसेना... इकडे आरुष आणि नीता समीरला शोधत वडाच्या झाडाजवळ आले. समीरला घाबरलेला पाहून नीताने विचारले, ''काय झाले समीर तुला एवढा घाम का आलाय..?'' ''हे बोलणारं झाड आहे काय??'' असे आरुष मोठ्याने ओरडला.

''बसा मुलांनो, मला तुमच्याशी बोलायचं आहे'' वड म्हणाले. सगळे झाडाजवळ बसतात.

''मुलांनो, तुम्ही माझ्या खांद्यावर सुरपारंब्याचा खेळ खेळतात तेव्हा मला खूप छान वाटते. कुणी माझ्या सावलीत बसते तेव्हा मला समाधान वाटते. पक्षी माझ्या फांद्यांवर येऊन



घरटी करतात तेव्हा मला खूप आनंद होतो. पण...''

'' पण काय?'' समीर म्हणाला. ''पण जेव्हा वटपौर्णिमेला कुणी माझ्या फांद्या तोडून नेतात तेव्हा मला असह्य वेदना होतात. बायका मला दोरे गुंडाळतात तेव्हा मला गुदमरल्यासारखे वाटते. पण काय करणार कुणी आम्हाला समजून घेतच नाही!

बाजूला उभ्या असलेल्या आपट्याच्या झाडानेदेखील आपले दु:ख सांगितले, 'दसरा आला की मला भीतीच वाटते..कुणी मला संपवून टाकेल हीच भीती मनात राहते. समीर म्हणाला, ''खरंच, तुम्ही आमच्यासाठी खूप उपयोगी आहात, आम्हाला सावली, फळे फुले देतात. आम्ही मात्र तुम्हाला त्रासच देतो.''

नीता म्हणाली,''शाळेत बाई सांगत होत्या, झाडे आपली मित्र असतात त्यांना आपण जपले पाहिजे.''

आरुष म्हणाला, ''माझे आजोबापण म्हणतात वृक्ष वल्ली आम्हां सोयरे.''


समीर म्हणाला, ''आपण झाडांना विनाकारण त्रास देतो. त्यांची पानेफुले तोडतो, याचा झाडांना त्रास होत असेल हे आपण समजून घेतच नाही. पण आज आपण सगळे शपथ घेऊया. कुणीही झाडे तोडणार नाही! याउलट आपण झाडाचे रक्षण करू.''

सगळे मित्र झाडाच्या रक्षणाची शपथ घेतात. हाताची साखळी करून सगळे वडाला अलिंगन देतात.

**कांता लक्ष्मण सोनवणे (स.शि.)**

म.न.पा. प्राथमिक शाळा, कांचनवाडी, औरंगाबाद.

# खरी कमाई



आपला भारत देश हा कृषिप्रधान देश आहे. शेती हाच आपला मुख्य व्यवसाय फार पूर्वी होता. शेती प्रामुख्याने खेडे–गावातून होत असे. अशाच एका आनंदपूर खेडेगावातली ही गोष्ट आहे.

या आनंदपूर नावाच्या खेडेगावात रामभाऊ नावाचा एक शेतकरी राहत होता. तो प्रामाणिक होता. खूप मेहनत करून तो शेती करत असत. असेच दिवस जात होते. कधी शेतीतून खूप उत्पन्न मिळत असत तर कधी  खूप कमी. त्याला विजय नावाचा एक मुलगा होता. विजय लहानपणी वडिलांसोबत शेतात जात असे. रामभाऊला मनोमन वाटायचे विजयने खूप शिकावे, मोठे व्हावे. रामभाऊने विजयला गावातील शाळेतून शिक्षण देण्याचे ठरवले.

विजयची आई शेतावर जाण्यापूर्वी विजयला शाळेत सोडवत असत व नंतर रामभाऊचा डबा घेऊन शेतात जात असत. विजय जसा मोठा होऊ लागला तसे त्याचे शिक्षणातले लक्ष कमी झाले. रामभाऊला विजयची खूप काळजी वाटत असे. विजयने शिक्षण शेवटी अर्ध्यावरच सोडले दररोज तो फक्त खाणे, पिणे, खेळणे व गावातील मित्रांसोबत इकडे तिकडे फिरणे एवढचे काम करत असे. तो त्याच्या आईला लक्ष्मीलाही मदत करत नसे.

लक्ष्मी अत्यंत साधी, सरळ, मायाळू व प्रेमळ आई होती. ती विजयला खूप समजावत असे. पण त्याचे लाडही करत असे. तिच्या अतिलाडाच्या परिणामामुळे विजय खूपच ऐतखाऊ बनत चालला होता, लक्ष्मी सकाळपासून खूप काम करत असे. चुलीवर

भाकरी करून रामभाऊला शेतात जेवण घेऊन जात असे व शेती कामातही मदत करत असे. रामभाऊला नेहमी काळजी वाटायची की विजयने शिक्षण तर अर्धवट सोडले; पण त्याने शेतीकामात तरी मदत करावी पण लक्ष्मी मात्र नेहमीच विजयला पाठीशी घालत असे.

रामभाऊ विचारात पडला, विजय मोठा झाल्याने तो त्याला मारूही शकत नव्हता. शेवटी रामभाऊने आपले मन कठोर केले व लक्ष्मीसमोरच विजयला ठणकावून सांगितले, ''जोपर्यंत तू स्वतः काही कमावून आणत नाही, तो पर्यंत मी तुझ्याशी बोलणार नाही.'' आणि ते घरातून तसेच शेताकडे गेले. संध्याकाळी शेतातून परतल्यानंतर विजयने वडिलांशी बोलण्याचा खूप प्रयत्न केला, पण वडील त्याच्याशी बोलले नाही. आता रोज ते म्हटल्याप्रमाणे वागू लागले. विजयचे आपल्या वडिलांवर खूप प्रेम होते. त्याला खूप कसे तरी वाटू लागले. आता कोठून कमाई करून आणून द्यायची त्याबद्दल त्याला चिंता वाटू लागली. विजयची आई वडील व मुलाचे वागणे रोज बघत होती. विजय दिवस दिवस जेवत ही नव्हता. त्याची अशी परिस्थिती पाहून आईला रहावले नाही. ती विजयला म्हणाली. ''हे बघ, जोपर्यंत तुला काम मिळत नाही, तोपर्यंत तू दिवसभर बाहेर जात जा व सायंकाळी घरी येत जा. मी तुला तीस रुपये देत जाईल ते तुझ्या वडिलांना देत जा. त्यामुळे त्यांचा रागही शांत होईल व ते तुझ्याशी बोलू लागतील?''

ठरल्याप्रमाणे विजय दिवस भर बाहेर राहिला व सायंकाळी परत आल्यावर आईकडून ३० रुपये घेऊन वडिलांना दिले व म्हणाला, ''दादा मी आज तीस रुपयाची कमाई केली. ''रामभाऊ त्याच्या कडेच बघून मनोमन हसला व त्या नोटा त्याने चुलीत



फेकून दिल्या. या प्रकारामुळे विजयला काहीच वाटले नाही. त्याच्या चेहऱ्यांवर थोडाही फरक जाणवला नाही. कारण त्याने मेहनत करुन कमाई केलेलीच नव्हती. असेच पाच सहा दिवस झाले. रोज हाच प्रकार घडत होता. आता हळूहळू लक्ष्मी जवळचे सर्व

पैसे संपले. शेवटी एक दिवस एकही पैसे उरले नाही. आता विजयला काम करणे भाग होते. काम केले नाही तर वडील आपल्याशी बोलणार नाही हाच प्रश्न त्याला सारखा त्रास देत होता. एक दिवस सकाळीच विजय उठला. क्षणाचाही विलंब न लावता आईला नमस्कार करुन तो कामासाठी घराबाहेर पडला दिवसभर विजयने बाजारात हमालाचे काम केले. खूप ओझे उचलले त्यातून त्याला वीस रूपये मिळाले. दिवसभर उन्हात काम केल्यामुळे विजय खूप थकला होता. परंतु त्याच्या चेहऱ्यावर मात्र आनंद दिसत होता. तो घरी आला व मोठ्या आनंदाने उत्साहाने वडीलांजवळ नेहमी प्रमाणे हातात नोटा दिल्या. रामभाऊने त्या नोटा घेतल्या व एक स्मित हास्य केले व त्याही चुलीत टाकल्या ही घटना घडत असताना विजयच्या डोळ्यांत टचकन पाणी आले कारण दिवसभर मेहनत करून त्याने कमाई केली होती.

विजयच्या डोळ्यात आलेले पाणी व त्याचा दु:खी चेहरा पाहून त्याचे वडील त्याला म्हणाले, ''हे पैसे तुझ्या कष्टाच्या कमाईचे असल्यामुळे तुझ्या डोळ्यांत चटकण पाणी आले व तू दु:खी झाला. या आधीची कमाई तू स्वतः कष्टाने न केल्यामुळे तुझ्या चेहऱ्यावर कुठलाच फरक पडलेला नव्हता. मीही तुझी परीक्षा पाहत होतो. मेहनत केल्याने पैशाचे मूल्य कळते. मेहनत केल्यास माणूस समाधानी होतो. परिश्रम केल्याने माणूस सुखी होतो. कष्टाशिवाय माणूस मोठा होत नाही. बेटा''

असे म्हटले आहे.

''इथे मोल ना दामाचे, मोती होतील घामाचे''

बाळा, तूपण कष्टाने आणि मेहनतीने मोठा हो.

वडिलांचे हे बोलणे ऐकून विजयला त्याची चूक कळली व यापुढे मी खूप मेहनत करील व मोठा यशस्वी माणूस होईल, अशी त्याने स्वत:च्या मनाशी प्रतिज्ञा केली.

सुविद्या सुशांत पंचपोर (मोदी)(स.शि.)
म.न.पा. मा. वि., बन्सीलालनगर,औरंगाबाद.

# जगण्याची उमेद



मुक्तेश्वर नावाच्या एका युवकाला अलंकारांच्या व्यवसायात यश न मिळाल्याने तो निराश झाला होता. व्यवसायानिमित्त त्याची भेट 'कनकांग' नावाच्या एका फल विक्रेत्यांशी झाली. कनकांग यास लेकीच्या लग्नासाठी काही नवीन पध्दतीचे अलंकार हवे आहेत, हे कळल्यामुळे मुक्तेश्वर त्यांना जाऊन भेटला.

मुक्तेश्वरकडून त्यावेळी कनकांग यास कळले की, तो हा व्यवसाय सोडून देणार आहे. कामासंबंधी बोलणे झाल्यावर कनकांग त्याला स्वतःची बाग दाखवण्यास घेऊन गेले. तेथे एक पेरूचे झाड सुकलेले होते. ते झाड दाखवून कनकांग मुक्तेश्वरला म्हणाले ''माझ्या बागेत मी पेरुची लागवड सुरू केली, त्या वेळचे हे पहिले पेरूचे झाड आहे. या झाडापासून मला खूप फायदा झाला नाही मी याच्या खत-पाणी आदी गोष्टींवर खूप खर्च केला. पण तरीही हे झाड सुकलं''

मुक्तेश्वर सुस्कारा सोडत म्हणाला, ''खरं आहे, कितीही परिश्रम केले तरी तुमच्या नशिबात लिहिलेलंच घडतं'' कनकांग यांनी फक्त मंदस्मित केले आणि ते त्याला गोदामात घेऊन गेले. तेथे पेरुचा ढीग पडता होता.



कनकांग म्हणाला,''पेरुची सगळी झाडं सुकली नाहीत. पहिल्या झाडाच्या अनुभवातून शिकून मी त्यानंतर पेरूची अनेक झाडं लावली. ती आज भरपूर उत्पन्न देत आहेत. पहिल्या झाडाच्या देखभालीत झालेले

नुकसान तर या मिळकतीसमोर कणभरही नाही. मित्रा पहिले झाड लावण्याचंच सोडून देणं हे उचित नाही.

मुक्तेश्वरला त्याच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले. कनकांग यांच्या मुलीच्या लग्नात त्याने बनवलेले काही दागिने उपस्थिताना आवडले आणि त्यातून त्याला काम मिळत गेले. त्याने कनकांग यांचे आभार मानले आणि नव्या उमेदीने स्वत:चा अलंकाराचा व्यवसाय वाढवला.लगेच यश मिळत नाही म्हणून नशिबाला दोष न देता परिश्रम करत राहणे आवश्यक असते. नवीन भाषा शिकताना सुरुवातीस तोडके मोडके बोल बोलले जातात, पण म्हणून नवीन भाषा बोलण्याचे सोडून देणे उचित नाही.

बाविस्कर पद्मावती रामभाऊ(स.शि.)

म.न.पा.कें.प्रा.शा., बन्सीलालनगर, औरंगाबाद.

# प्रयत्न

पावसाळ्याचे दिवस होते. बाहेर जोरात पाऊस पडत होता. रात्र फार झाली होती. अचानक तेवढ्यात वीजही गायब झाली होती. बाजूच्या मंदिरात कीर्तन सुरू होते. परंतु वीज गायब झाल्यामुळे अचानक एकच आरडाओरड ऐकू आला. त्यामुळे सर्व जण त्या मंदिराच्या दिशेने पळाली. तर एका आजीच्या पायाला सापाने चावले होते, त्यामुळे तिला फारच वेदना होत होत्या आता काय करावे ? कोणालाच काही समजेना. गावातील मोठी माणसे लाठी-काठ्या घेऊन सापाला शोधू लागले. पण तो केव्हाच निघून गेला होता. आजीच्या पायावर मात्र व्रण दिसत होते. आजी जोरात ओरडत होती.



लोकांची गर्दी फार वाढली होती. काही जण देवा वाचव आता कसं होईल ? असं म्हणू लागले. मदत मागू लागले. तेवढ्यात अजय नावाचा एक मुलगा पळत-पळत आला व त्या आजीकडे गेला. तिची विचारपूस केली. स्वत:जवळ असलेल्या रुमालाने आजीच्या साप चावलेल्या पायात घट्ट बांधले. त्यामुळे सापाचे विष सगळीकडे पसरले नाही व पळत जाऊन डॉक्टरांना आणले. डॉक्टरांनी आजीला इंजेक्शन दिले. साप चावलेल्या ठिकाणी जखम करून विष बाहेर काढले आणि मग आजीलासुद्धा दहा-पंधरा मिनिटांनी बरे वाटले.



**मनीषा गुलाबराव जाधव, (स.शि.)**

म.न.पा.प्रा.शा., पोलिस हेड क्वॉर्टर, औरंगाबाद

# माझ्या स्वप्नातील औरंगाबाद शहर





# मूठभर गोष्टी

**औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद**

**समग्र शिक्षा अभियान-शिक्षण विभाग**